MHRG100009992024

# म. सं. कौ. हि. का. अर्ज क्रमांक १८/२०२४ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी सामनेवाले यांच्याविरूध्द कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अन्वये कलम १८, १९, २० नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचा अर्ज, सामनेवालांचा जबाब निशाणी क्र. १३, अर्जदार क्र. १ हिचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र. ०८, सामनेवालांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र. १९ व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे निशाणी क्र. २४ वर दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. उभय पक्षातर्फे युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढत असताना उपलब्ध परिस्थितीचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित झाले. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करतात का की, सामनेवाला यांनी तिचा कौटूंबिक हिंसाचार केला ? | **होय.** |
| २. | अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करतात का की, अर्जदार क्र. १ व २ अंतरिम निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे का ? असल्यास किती ? | **अंशत: होकारार्थी.** अर्जदार क्र. २ हिला दरमहा निर्वाह भत्ता रक्कम रू. ४,०००/-. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करतात का की, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे का ? | **अंशत: होकारार्थी.** |
| ४. | अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करतात का की, ते मागणी करतात त्याप्रमाणे निवासाचा आदेश मिळण्याबाबत पात्र आहेत का ? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## : का र ण मि मां सा :

### मुद्दा क्र. १ बाबत –

४. अर्जदारांचा अर्ज मंजुर होणेसाठी, कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम प्रमाणे अर्जदारांना प्रथमदर्शनी हे शाबीत करणे गरजेचे आहे की, सामेनवाला यांनी अर्जदारांचा कौटूंबिक हिंसाचार केला व त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ हे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे का ? कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कायदेशीर तरतुदीच्या अनुषंगाने अर्जदारांचा अर्ज व सादर केलली कागदपत्रे यांचे प्राथमिक अवलोकन करणे गरजेचे ठरेल.

५. सामनेवाला क्र. १ हे अर्जदार क्र. १ चे पती आहेत. त्यांचा विवाह दिनांक १८/०३/२०२१ रोजी झाला. अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांची मुलगी आहे. सामनेवाला क्र. २ ते ४ हे अनुक्रमे सासु, सासरे, नणंद असे आहेत. अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचा प्रेमसंबंधातुन विवाह झाला आहे.

६. अर्जदारांच्या कथनांनुसार, सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदार क्र. १ च्या नावे जाणीवपुर्वक कर्ज काढुन अर्जदारांना त्रास देवुन हैराण करण्याचे ठरविले. सतत पैश्याची मागणी करून, संशय घेवुन अर्जदार क्र. १ हिस मानसिक,

शारिरिक व आर्थिक त्रास दिला. त्यामुळे अर्जदार हिला कोणताही आधार राहिलेला नाही. या ना त्या प्रकारे सामनेवाला यांनी अर्जदार हिला त्रास दिला. कर्ज ठेवीसाठी अर्जदार दुसऱ्या नोकरीसाठी प्रयत्न करीत असुन सामनेवाला त्याबाबत माहिती घेवुन अर्जदार क्र. १ हिला नोकरी मिळु नये म्हणुन गैरसमज पसरवत आहे. त्यामुळे अर्जदारांचे जगण असाहाय्य झाले आहे. मार्च, २०२४ पासुन सामनेवाला यांनी अर्जदारांना अन्न, वस्त्र, निवारा व औषधपाण्याची कोणतीही काळजी घेतलेली नाही. अर्जदारांनी अशाप्रकारे वेगवेगळे प्रसंग तिला झालेल्या शारिरिक, मानसिक व कौटूंबिक छळाबाबतचे नमुद केले आहेत.

७. प्रस्तुत अर्जास सामनेवाला यांनी निशाणी क्र. १३ वर त्यांचे म्हणणे दाखल करून, नातेसंबंध मान्य केले, परंतु प्रस्तुत अर्जातील संपुर्ण कथने तपशीलवार नाकारली. अर्जदार क्र. १ च्या माहेरचे लोक खास करून आई–वडील, यांचा सुरूवातीपासुन विरोध होता. सामनेवाला क्र. १ याचा पहिला घटस्फोट झाल्याने ही बाब अर्जदार क्र. १ च्या आईवडिलांना सुरूवातीपासुन मान्य नसल्याने त्यांच्या मनात वाईट गृह होता. सामनेवाला हे अर्जदार क्र. १ च्या माहेरशी संबंध ठेवु नये म्हणुन दबाव आणत असल्याची बाब सामनेवाला यांनी नाकारली. अर्जदार क्र. १ च्या माहेरच्या लोकांना विवाह मान्य नसल्याने लग्नाच्या दिवशी रात्री अर्जदार हिचे माहेरचे सर्व मंडळी सामनेवाला क्र. १ यांच्या घरामध्ये येवुन भांडण करून शिवीगाळ केली, दमदाटी केली व धमकी देवुन निघुन गेले. अर्जदार क्र. १ गरोदर असताना सामनेवाला यांनी तिचा खुप चांगल्याप्रकारे खाणे–पिणे व लाड पुरविले होते. सामेनवाला यांनी अर्जदारांचा कोणताही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. प्रस्तुत अंतरिम अर्जाच्या निकालासाठी उभयपक्षकारांचे महत्वाचे घटनाक्रम पाहणे योग्य होईल.

८. वरील सर्व युक्तीवादावरून व घटनांवरून अर्जदार व सामनेवाला यांच्यामधील संबंध हे चांगले नसल्याचे दिसुन येते. त्यांच्यामध्ये सतत वाद होत

असल्याचेही प्रथमदर्शनी दिसुन येते. कौटूंबिक हिंसाचार ही घटना चार भिंतीच्यामध्ये स्त्री अनुभवते. सामनेवाला अर्जदार यांना फारकतीच्या कालावधीमध्ये पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारली नसल्याचे दिसुन येते. नैतिक जबाबदारीनुसार स्वत:च्या पत्नीच्या पालनपोषणाची जबाबदारी टाळणे हा ही प्रथमदर्शनी एक प्रकारे कौटूंबिक हिंसाचारच असल्याचे दिसुन येते. म्हणुन मुद्दा क्र. १ चे उत्तर 'होकारार्थी' देण्यात आहे.

## मुद्दा क्र. ३ बाबत –

९. अर्जदारांतर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. १ हिचेवर हिंसाचार झाला आहे. अर्जदार क्र. १ हिने सामनेवाला विरूध्द संरक्षणाची मागणी केली आहे. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार क्र. १ हिने कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे शाबीत केले आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार यांची सुरक्षितता लक्षात घेता, सामनेवाला यांच्या विरूध्द अर्जदारांवर कौटूंबिक हिंसाचार करू नये, असा संरक्षण आदेश देणे उचीत होईल. म्हणुन मुद्दा क्र. ३ चे उत्तर 'अंशत: होकारार्थी' देण्यात येत आहे.

## मुद्दा क्र. २ बाबत –

१०. अर्जदारांतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, सामनेवाला क्र. १ हा लक्ष्मी ऑरगॅनिक लिमिटेड, महाड एमआयडीसी या कंपनीमध्ये काम करीत असुन त्याला दरमहा सुमारे चाळीस हजार रूपये पगार आहे. सामनेवाला क्र. ३ हे तांब्या पितळेची भांडी बनविण्याचे व कलई करीत असुन त्यांचा एक व्यावसायिक गाळा भाडयाने दिला असल्याने त्यांना स्थीर उत्पन्न आहे. सामनेवाला क्र. १ याच्यावर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. याशिवाय अर्जदार क्र. १ हिच्यावर अर्जदार क्र. २ च्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. अर्जदार क्र. २ ही तीन वर्षांची आहे. तरी नर्सरी मध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या औषधोपचाराची जबाबदारी सुध्दा अर्जदार

क्र. १ हिला घ्यावी लागते.

**११.** सामनेवाला क्र. १ यांनी त्यांना अर्जदार कथन करते त्याप्रमाणे उत्पन्नाचे साधन असल्याचे नाकारले. सामनेवाला क्र. १ यांच्या कथनांनुसार, अर्जदार ही बी. सी. ए. इंजिनिअरिंग अशी उच्च शिक्षीत असुन याअगोदर ती पनवेल येथे नोकरी करीत होती. तिला लग्नाअगोदर अठरा ते वीस हजार इतका पगार होता. सध्या ती महाड एमआयडीसीमध्ये नामांकित कंपनीत काम करीत असुन तिला दरमहा पंचवीस हजार इतका पगार आहे. अर्जदार क्र. १ यांच्या वडिलांचा पिठाच्या गिरणीचा व्यवसाय असुन महाड येथे त्यांचे जनरल स्टोअर्स आहे. अर्जदार क्र. १ यांचा भाऊ पनवेल येथे चांगल्या नोकरीस आहे. सामनेवाला क्र. १ ने त्याला चाळीस हजार रूपये पगार असल्याचे कथन करून, दरमहा चौदा हजार रूपये कर्जाचा हफ्ता त्याला भरावा लागतो. त्याच्या कपंनीतील पी. एफ. एलटीए व इतर सर्व कटींग होवुन त्याला दरमहा तेरा हजार रूपये पगार हातामध्ये मिळतो. त्याला त्याच्या वृध्द आई-वडिलांची जबाबदारी पार पाडावी लागते, कारण ते वृध्द झाल्यामुळे कामधंदा करीत नाहीत. सामनेवाला क्र. २ यांची सन २०१९ मध्ये ह्यविकाराची ॲन्जोप्लास्टी झाली असल्याने तिला चार हजार रूपये दरमहा खर्च येतो. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे.

**१२.** परस्पर विरोधी कथने व युक्तीवादाचा विचार केला असता, उभयपक्षकारांनी त्यांची दाखल केलेली मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रे पाहणे आवश्यक आहे. अर्जदार क्र. १ हिने तिचे शपथपत्र निशाणी क्र. ०८ वर दाखल केले असुन तिचे शिक्षण बी. सी. ए. इतके झाले आहे. अर्जदार क्र. १ हिने तिला दरमहा नऊ हजार रूपये पगार असल्याचे नमुद केले आहे. परंतु, अर्जदार क्र. १ ने तिला तसा पगार असल्याचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. यावरून एक बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन असुन ती कमवती व्यक्ती आहे. अर्जदार क्र. १ ने तिला उदरनिर्वाहासाठी पाच हजार रूपये, घर खर्च पाच

हजार रूपये व मुलीच्या शिक्षण व पालनपोषणासाठी दरमहा पाच हजार रूपये खर्च येत असल्याचे कथन केले आहे.

**१३.** सामनेवाला क्र. १ यांनी निशाणी क्र. १९ वर त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले असुन सामनेवाला क्र. १ यांचे शिक्षण वाणिज्य पदवीधारक असे आहे. सामनेवाला क्र. १ यांनी कथन केले आहे की, ते लक्ष्मी ऑरगॅनीक कंपनीमध्ये सन २०२४ पासुन कामगार म्हणुन काम करीत असुन त्यांना दरमहा २७,५७९/– रूपये इतका पगार आहे. त्यांनी अर्जदार क्र. २ च्या आजारपणासाठी कंपनी सोसायटीचे कर्ज घेतले असुन त्या कर्जाचा हफ्ता दरमहा रू. १४,०४८/– इतका असुन सर्व वजावटी वगळता त्यांच्या हातामध्ये रू. १३,५३१/– इतका पगार मिळतो. सामनेवाला क्र. २ व ३ यांना उत्पन्नाचे साधन असल्याबाबत अर्जदार यांनी कोणताही सक्षम पुरावा सादर केलेला नाही. प्रथमदर्शनी त्यांचे वय पाहता, त्यांची जबाबदारी ही सामनेवाला क्र. १ वर असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१४.** त्यामुळे उभयपक्षातील दायित्व व जबाबदाऱ्या याचा प्रथमदर्शनी तुलनात्मक अभ्यास करून अंतरिम पोटगीची रक्कम निश्चित करणे योग्य होईल. अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांना उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सामनेवाला क्र. १ यांनी त्यांच्या शपथपत्राच्या पृष्ठयर्थ माहे मे, २०२५ रोजीची पगारपत्रकाची प्रत दाखल केली आहे. परंतु, अर्जदार यांनी त्यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. असे असले तरी अर्जदार क्र. १ यांनी ती कमवती असल्याचे मान्य केले आहे. उभयपक्षकारांच्या प्रथमदर्शनी पटलावर उपलब्ध असलेल्या उत्पन्नाचा तुलनात्मक विचार करता, अर्जदार क्र. १ ही स्वत:चे पालनपोषण करण्यास तिला उत्पन्नाचे साधन असल्याने सक्षम आहे. त्यामुळे अंतरिम अर्जाच्या निकालासाठी अर्जदार क्र. १ हिला अंतरिम पोटगी मिळण्यास प्रथमदर्शनी पात्र नाही.

**१५.** अर्जदार क्र. २ यांचे नातेसंबंध उभयपक्षकारांना मान्य आहे. त्यामुळे मुलीचे पाल्य या नात्याने तिच्या पालनपोषणाची समांतर जबाबदारी पार पाडण्याचे कर्तव्य हे अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचे आहे. सध्या अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ हिच्यासोबत माहेरी राहत असल्याने तिच्या पालनपोषणाची संपुर्ण जबाबदारी ही अर्जदार क्र. १ सोसत असल्याचे दिसुन येते. सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार क्र. २ हिच्या पालनपोषणासाठी कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध पुरावा व सद्य परिस्थितीचा विचार करता, अर्जदार क्र. २ हिचा सांभाळ करण्याची अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांची समांतर जबाबदारीचा विचार करता, सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. २ हिच्या पालनपोषणासाठी व शिक्षणासाठी समांतर जबाबदारी नुसार तिला दरमहा रक्कम रू. ४,०००/– (अक्षरी चार हजार रूपये फक्त) इतकी अंतरिम पोटगी मंजुर करणे उचीत होईल. त्याप्रमाणे मुद्दा क्र. २ चे उत्तर 'अंशत: होकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

## मुद्दा क्र. ४ बाबत –

**१६.** अर्जदार क्र. १ ने मागणी केली आहे की, ती भाडयाने घेवुन इच्छीणाऱ्या दरमहा भाडयाची, लाईट बील, मेंटेनन्स इत्यादी रक्कम रू. १२,०००/– सामनेवाला क्र. १ यांच्याकडुन देण्यात यावी. अर्जदार क्र. १ ही सध्या तिच्या माहेरी राहत असुन तिला सध्या राहण्याची व्यवस्था असल्याबाबत सामनेवालातर्फे युक्तीवाद करण्यात आला. सामनेवाला राहत असलेले घराबाबत कोणताही पुरावा दाखल केला नसुन त्या घरामध्ये अर्जदार हिने राहण्याची इच्छा दर्शविलेली नाही. परंतु, तिने कथन केल्याप्रमाणे घरभाडयाची मागणी केली आहे. परंतु, अर्जदार क्र. १ हिने कोणताही भाडेकरार किंवा ती राहण्यास इच्छुक असलेले ठिकाणी किती भाडे लागते याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सध्या अर्जदारांच्या कथनांनुसार, त्यांना राहण्याची व्यवस्था माहेरी आहे. प्रथमदर्शनी

पुराव्याअभावी प्रस्तुतचा मुद्दा निकाली करणे योग्य होणार नाही. सबब, मुद्दा क्र. ४ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

## मुद्दा क्र. ५ बाबत –

**१७.** वरील सर्व विवेचनांवरून, मुद्दा क्र. ५ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | अर्जदाराचा अर्ज अशंत: मंजुर करण्यात येत आहे. |
| **२.** | सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. २ ला दरमहा रूपये ४,०००/– (अक्षरी रूपये चार हजार मात्र) इतकी रक्कम अंतरिम पोटगी म्हणुन हा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन ते पुढील आदेश होईपर्यंत देण्यात यावी. |
| **३.** | सामनेवाला यांच्या विरूध्द असा संरक्षण आदेश देण्यात येतो की, त्यांनी अर्जदारांचा कोणत्याही प्रकारे कौटूंबिक हिंसाचार करू नये. |
| **४.** | सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच, एक प्रत संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. |
| *(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)* | |

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2025.10.29 17:52:08 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक : २९/१०/२०२५. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. Bhushan T. Deshmukh |
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav, 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Date of decision / typed | :- | 29/10/2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 29/10/2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 29/10/2025 |